मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दिनांक २६ ऑगस्ट २०२३। पान १

# आम्ही विचारधारा सोडलेली नाही!

## उपमुख्यमंत्री पवार यांचे स्पष्टीकरण; मोदी, गडकरींचे कौतुक

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी ।**

'देशात प्रशस्त रस्त्यांची निर्मिती', 'विमानतळ व रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण', 'चांद्रयान-३ चे यश', 'जागतिक अर्थव्यवस्थेत पाचवा क्रमांक असताना, देशाला तिसऱ्या स्थानावर आणण्याचा संकल्प', याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज चिंचवडमध्ये तोंड भरून कौतुक केले. 'आम्ही आमची विचारधारा सोडलेली नाही. छत्रपती शिवाजी महाराज, फुले-शाहू-आंबेडकर ही आमची विचारधारा आहे. संतांचा विचार घेऊन, आम्ही चालत आहोत, तो विचार समाजाला दिशा देणारा आहे,' असेही त्यांनी स्पष्ट केले. भाजप-शिवसेना (शिंदे गट) सरकारमध्ये सहभागी होऊन, उपमुख्यमंत्री झाल्यानंतर अजित पवार पहिल्यांदा पिंपरी-चिंचवड महापालिकेत आले. अधिकाऱ्यांच्या बैठकीत त्यांनी विकास कामांचा आढावा घेतला. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला. काही कार्यकर्त्यांच्या घरी गेले आणि चिंचवड येथे आयोजित राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्यांनी भाजप-शिवसेनेसोबत जाण्याबरोबरच भविष्यातील वाटचालीबाबतची भूमिका स्पष्ट केली. लोकसभा, विधानसभासह आगामी निवडणुका महायुती म्हणून लढणार आहे. मात्र, महापालिका, जिल्हा परिषदांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्याबाबत स्थानिक कार्यकर्त्यांनी ठरवावे, असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले. ते म्हणाले, ''सत्तेसाठी नाही, तर विकासकामे होण्यासाठी सरकारमध्ये सहभागी झालो आहे. जातीय सलोखा राहण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था सुरक्षित राहावी, हा उद्देशी त्यामागे आहे. नात्यागोत्याचे, जातीयतेचे राजकारण करायचे नसून, सर्वसामान्यांची कामे करायची आहेत.''



### अजित पवार म्हणाले....

- » नऊ वर्षातील प्रगती व चांद्रयान मोहिमेमागे पंतप्रधान मोदी यांचे मजबूत नेतृत्व
- » निगडी ते कात्रज मेट्रोने जोडण्यासाठी राज्य सरकारचा हिस्सा देणार
- » सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय सर्वांशी विचार करून घेतला
- » सर्वांना सुरक्षित वाटावे, अशी आमची भूमिका

### 'नो कॉमेंट्स

» महापालिकेत आढावा बैठक झाल्यानंतर अजित पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी 'अजित पवार आमचे नेते आहेत', या शरद पवार यांच्या विधानाबाबत विचारले असता, त्यांनी, 'नो कॉमेंट्स' म्हणून बोलणे टाळले. 'तुम्ही साहेबांच्या वक्तव्याकडे कसे पाहता,' असे विचारल्यावर 'तुम्ही जसं पाहता, त्याच्या उलट पाहतो,' असे वक्तव्य त्यांनी केले. प्रत्येक राजकीय प्रश्नांवर 'नो कॉमेंट्स' म्हणत 'विकासाचं बोला ना!' असे सुचविले.

### 'चांद्रयान'बाबत मागितली माफी


» 'चांद्रयान-३' मोहिमेबाबत अजित पवार यांनी 'चंद्रकांत' असा शब्दप्रयोग केला. त्यावर माफी मागत पवार म्हणाले, ''उपमुख्यमंत्री म्हणून काम करताना चूक व्हायला नको. पण, कामाच्या व्यापात चुकलो. मी माफी मागतो. चूक झाली की माफी मागणारा मी कार्यकर्ता आहे.' मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अधिकारात मी हस्तक्षेप करत नाही. आम्ही सर्वांना विश्वासात घेऊन काम करत आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# शुद्ध पाणीपुरवठ्याबाबत उपाययोजना कराव्यात!

## भाजप वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांची मागणी

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शहरातील नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याबाबत महापालिका प्रशासनाने तत्काळ उपाययोजना कराव्यात. अशुद्ध पाण्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, याबाबत गांभीर्याने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे, अशी मागणी भाजप वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.





महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन पाठवले आहे. त्यात म्हटले आहे की, गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील नागरिकांना गढूळ, अशुद्ध पाणीपुरवठा होत आहे. चिखली, डुडुळगाव, मोशी, जाधववाडी, आदींसह विविध ठिकाणी ही समस्या जाणवत आहे. याबाबत नागरिक तक्रारी करीत आहेत. मात्र, त्यांना पालिका कर्मचारी सकारात्मक प्रतिसाद देत नाहीत. अनेक भागात कंपन्यांचे रासायनमिश्रित पाणी प्रक्रिया न करता नदीत सोडले जात आहे. त्यामुळेप्रदूषणात भर पडत आहे. जलचर मृत्युमुखी पडत आहेत. मैलामिश्रित पाणी पिण्याच्या पाण्याच्या वाहिनीत घुसून नागरिकांना अशुद्ध पाणी मिळत आहे. यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### पाणी समस्येमुळे नागरिक त्रस्त...

» सारथी हेल्पलाईनवर पाणीपुरवठ्याबाबत तक्रारी मांडूनही नागरिकांच्या समस्या सुटलेल्या नाहीत. अनेक सोसायटीधारकांना खिशातील पैसे खर्च करून पाण्याचा टँकर मागविण्याची वेळ येत आहे. यामुळे शहरातील नागरिक त्रस्त आहेत. त्यामुळे ज्या भागात कमी दाबाने पुरवठा होत आहे, तिथे देखील योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.

# आगामी लोकसभा आणि विधानसभेला राष्ट्रवादी महायुतीतर्फे लढणार

## चिंचवडमधील मेळाव्यात अजित पवार यांचे वक्तव्य



### एकट्याच्या ताकदीवर लढायच?

» या पूर्वी काँग्रेस पक्षासोबत आघाडी होती ती परिस्थिती राहील, असं अजित पवार यांनी स्पष्ट केलं आहे. त्या-त्या जिल्ह्यातील, तालुक्यातील, शहरातील नेत्यांनी आणि नागरिकांनी ठरवायचं की युती करायची की एकट्याच्या ताकदीवर लढायचं. निवडून येणार असाल अशी खात्री असेल तर तुम्ही युती करू नका.

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकसभा आणि विधानसभा महायुतीतर्फे लढणार असल्याचे स्पष्ट केले आहे. आपल्याकडे पक्ष आणि चिन्ह आहे, असे वक्तव्य देखील अजित पवार यांनी केले आहे. ते चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते. अजित पवार हे आज उपमुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच पिंपरी- चिंचवड शहरात आले होते. यावेळी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, योगेश बहल, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, मयूर कलाटे, शाम लांडे, प्रशांत शितोळे, राहुल भोसले, अतुल शितोळे, जगदीश शेट्टी, तानाजी खाडे, सतीश दरेकर, फझल शेख, विशाल वाकडकर, विशाल काळभोर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. अजित पवार म्हणाले, लोकसभा आणि विधानसभा आपण महायुतीतर्फे लढणार आहोत. आपल्याकडे पक्ष आणि चिन्ह आहे. महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच काय? असा प्रश्न तुमच्या मनात निर्माण येईल. या पूर्वी काँग्रेस पक्षासोबत आघाडी होती ती परिस्थिती राहील, असं अजित पवार यांनी स्पष्ट केलं आहे. त्या-त्या जिल्ह्यातील, तालुक्यातील, शहरातील नेत्यांनी आणि नागरिकांनी ठरवायचं की युती करायची की एकट्याच्या ताकदीवर लढायचं. निवडून येणार असाल अशी खात्री असेल तर तुम्ही युती करू नका. मतांची विभागणी न होता युती केली पाहिजे, तर युती करा, असे अजित पवार म्हणाले.

# कचरा डेपोला पर्यायी जागा शोधणार!

## उपमुख्यमंत्री पवार यांचे निर्देश : ताथवडेतील शाळा हस्तांतराचा प्रश्नही मार्गी



### सोसायटीधारकांच्या मागणीला यश

» ताथवडे गावचा समावेश महापालिका हद्दीत २००९ मध्ये समावेश झाला आहे. मात्र, येथील जिल्हा परिषद शाळेचे हस्तांतरण झाले नाही. परिणामी, गोरगरिब कुटुंबातील विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधांपासून वंचित रहावे लागले होते. याबाबत युवा नेते संदीप पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन दिले होते. यावरही महापालिका भवनातील बैठकीत चर्चा करण्यात आली. अजित पवार यांनी प्रशासनाला उचित कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यामुळे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे तात्काळ संपर्क केला आणि शाळा आहे त्या परिस्थितीमध्ये हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कार्यवाही सुरू केली. त्यामुळे गेल्या १३ वर्षांपासून प्रलंबित असलेला ताथवडेतील शाळा हस्तांतराचा प्रश्नही लवकरच मार्गी लागणार आहे.

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरीचिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून मौजे पुनावळे येथे प्रस्तावित कचरा डेपोला स्थानिक नागरिक आणि सोसायटीधारकांनी तीव्र विरोध केला आहे. त्यामुळे प्रशासनाने कचरा डेपोकरीता वन विभागाची पर्यायी जागा शोधावी. लोकांना त्रास होईल, अशी भूमिका घेवू नये. तसेच, किमान ५०० मीटर बफर झोन आणि वृक्षाच्छा भागात कचरा डेपो किंवा प्रकल्प विकसित करावा, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. दरम्यान, शहरातील विविध प्रकल्पांबाबत महापालिका भवनामध्ये बैठक घेण्यात आले. यावेळी आमदार अण्णा बनसोडे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी आमदार विलास लांडे, माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे, माजी महापौर योगेश बहल, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट, युवा नेते संदीप पवार आदी उपस्थित होते. अजित पवार म्हणाले की, पुनावळेतील कचरा डेपोबाबत स्थानिक नागरिकांनी माझ्याकडे निवेदन दिले आहे. कचरा डेपो लोकवस्तीच्या ठिकाणी करताना काळजी घेतली पाहिजे. पुनावळेतील प्रस्तावित जागेच्या भोवती मोठ्याप्रमाणात लोकवस्ती झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने पर्यायी जागेचा शोध घ्यावा. नागरिकांना त्रास होईल, असा प्रकल्प राबवू नये. तसेच, वन विभागाकडून नवीन जागेत आणि किमान ५०० मीटर बफर झोन राहील, अशी जागा निश्चित करावी. पुनावळेतील ग्रामस्थ आणि सोसायटीधारकांच्या प्रतिनिधींनी नुकतीच अजित पवार यांची मुंबईत भेट घेतली होती. स्थानिक लोकप्रतिनिधी चेतन भुजबळ, नवनाथ ढवळे यांनी याकामी पुढाकार घेतला. तसेच, सर्वपक्षीय नेत्यांना साकडे घातले होते. विशेष म्हणजे, ''मी पुनावळेकर'' ही मोहीमही सुरू केली होती. कचरा डेपोच्या भोवती किमान १५ हजार लोकवस्ती असून, सोसायटीधारकांना कचरा डेपो आणि दुर्गंधीचा त्रास होणार आहे. त्यामुळे कचरा डेपो अन्य ठिकाणी स्थलांतरीत करावा, अशी मागणी करण्यात आली होती. यावर सकारात्मक प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला पर्याय शोधण्याचे निर्देश दिले आहेत.

# विद्याशाखांमध्ये मराठी अनिवार्य करा!

## विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचा ठराव

पुणे।
न्यूज एक्स्प्रेस मराठी।
मराठी ही ज्ञानभाषा, उद्योगाची आणि रोजगाराची भाषा होण्यासाठी विद्यापीठीय स्तरावर शिकवल्या जाणाऱ्या सर्व विद्याशाखेत मराठी हा विषय अनिवार्य करण्याचा ठराव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाच्या बैठकीत शुक्रवारी करण्यात आला. विद्यापीठ स्तरावर असा ठराव करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ आहे.




अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास मंडळाची बैठक विद्यापीठात झाली. या बैठकीला अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. शिरीष लांडगे, सदस्य डॉ. सुधाकर शेलार, डॉ. प्रमोद आंबेकर, डॉ. शांताराम चौधरी, डॉ. पोर्णिमा घोडके, डॉ. सुरेश जाधव, राजीव बर्वे, डॉ. शीतल गोर्डे पाटील, डॉ. शोभा तितर, संजय ऐलवाड आदी उपस्थित होते. गेल्या काही वर्षांत शैक्षणिक आणि सामाजिक जीवनात मातृभाषेकडे दुर्लक्ष केल जात आहे. त्यामुळे मराठी भाषा टिकवण्यासाठी, मराठी भाषेची व्याप्ती वाढवण्यासाठी महाविद्यालयीन, विद्यापीठीय स्तरावरील प्रत्येक विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना मराठी शिकवली जावी. त्यामुळे ती ज्ञानभाषा होण्यासह व्यवसायाची, उद्योगाची भाषा होण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. त्यानंतर सर्व विद्याशाखांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याचा ठराव बैठकीत करण्यात आला.

अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणात प्रादेशिक भाषांतून शिक्षणावर भर देण्यात आला आहे. तसेच तत्कालीन पुणे विद्यापीठाची स्थापना मराठी भाषेसाठी झाली होती. ही पार्श्वभूमी लक्षात घेता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याची गरज आहे.

त्यामुळे सर्व विद्याशाखांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याचा ठराव करण्यात आला. हा ठराव करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातील पहिलेच आहे. सर्व विद्याशाखांमध्ये मराठी शिकवल्यास मराठी भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होईल. तसेच मराठी भाषेत पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएच.डी. केलेल्या तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. मराठी अनिवार्य करण्याच्या मागणीसाठी कुलगुरूंसह राज्यपाल, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे.

**भाषा भवनासाठीही प्रयत्न**

विद्यापीठात भाषा भवन उभारणीचे काम दीर्घ काळ प्रलंबित आहे. त्यामुळे भाषा भवनासाठीही प्रयत्न केले जाणार असल्याचे डॉ. सांगळे यांनी सांगितले.

### तरुणांना नोकरीच्या संधी

» सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याची गरज आहे. त्यामुळे सर्व विद्याशाखांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याचा ठराव करण्यात आला. हा ठराव करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातील पहिलेच आहे. सर्व विद्याशाखांमध्ये मराठी शिकवल्यास मराठी भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होईल. तसेच मराठी भाषेत पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएच.डी. केलेल्या तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. मराठी अनिवार्य करण्याच्या मागणीसाठी कुलगुरूंसह राज्यपाल, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे.

# स्मशानभूमी नसल्याने रस्त्यावरच अंत्यसंस्कार!

## लवकरात लवकर कार्यवाही करुन जागा उपलब्ध करून द्यावी

पुणे ।
न्यूज एक्स्प्रेस मराठी।
'महाराष्ट्र आणि देश वेगाने पुढे जात आहे. देशाचा अत्यंत वेगाने विकास होत आहे', अशी विधानं राजकीय नेते, लोकप्रतिनिधी यांच्या तोंडून सातत्याने ऐकायला मिळतात. विकास होत आहे हे सांगण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार करोडो रुपये जाहिरातींवर खर्च करत आहे. मात्र दुसऱ्या बाजूला गाव पातळीवर भीषण वास्तव दिसून येत असून, पुणे शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या घेरा सिंहगड येथे वर्षानुवर्षे रस्त्यावर अंत्यसंस्कार करावे लागत आहेत. स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून



देण्याचे वन विभागाने दिलेले आश्वासनही लाल फीतीत अडकल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहेत. सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या आतकरवाडी येथील आदिवासी महादेवकोळी समाजातील महिलेचे काल निधन झाले होते. पाऊस सुरू असल्याने अंत्यसंस्कार कोठे आणि कसे करायचे? हा प्रश्न नागरिकांसमोर होता. पावसाने उघडीप दिल्यानंतर शेवटी सकाळी रस्त्यावर अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय ग्रामस्थ व नातेवाईकांनी घेतला. अंत्यसंस्कार सुरू असताना पुन्हा पाऊस आल्याने जळत्या चितेवर नागरिकांना अक्षरशः पत्रे धरुन थांबावे लागले. गावात स्मशानभूमी नसल्याने वर्षानुवर्षे नागरिक हाल सहन करत आहेत. गावाला लागून शेकडो एकर वन जमीन आहे. वन विभागाने दहा गुंठे जमीन स्मशानभूमीसाठी देण्याचे आश्वासनही दिलेले आहे, मात्र 'प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयात पडून असल्याची' माहिती मिळत आहे.

> 'पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या आमच्या गावची ही दुसरी बाजू आहे. उन्हाळा असो वा पावसाळा अंत्यसंस्कार करताना असेच हाल सहन करावे लागत आहेत. टीव्हीवरुन विकासाबाबत बोलणारांनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे.'
>
> **- चेतन जेधे,** नागरिक आतकरवाडी (जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती सदस्य.)

> 'आतकरवाडीच्या स्मशानभूमीसाठी दहा गुंठे जागा देण्यात येणार असून त्याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आलेला आहे. या गावामध्ये वनहक्क कायद्यानुसार दावे मंजूर नसल्याने सदर प्रस्तावास मंजुरी मिळण्यात अडचण येत आहे. जिल्हाधिकारी स्तरावरुन याबाबत तोडगा निघू शकतो.'
>
> **-प्रदीप संकपाळ,** भांबुर्डा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनविभाग पुणे.

# क्रिकेट स्टेडियमसाठी पुणे आदर्श ठरणार

## एक आयडिया वाचविणार कोट्यवधी लिटर पाणी



**उपक्रम असा राबवणार**

- » जलव्यवस्थापन अभ्यासक कर्नल शशिकांत दळवी (निवृत्त) सल्लागार
- » या महिन्यात प्रत्यक्ष काम सुरू
- » पहिल्या टप्प्यात रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पाची क्षमतावाढ
- » क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेनंतर सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारणार

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन'च्या गहुंजे येथील स्टेडियमवर पावसाच्या पाण्याचा पुनर्वापर करून तेच पाणी स्टेडियमसाठी पुन्हा वापरात आणले जाणार आहे. येथे राबविण्यात येणारे जल संवर्धनाचे हे मॉडेल देशभरातील क्रिकेट स्टेडियमसाठी आदर्श ठरणार आहे. मैदानासह आजूबाजूच्या ठिकाणी पावसाळी पाण्याचा पुनर्वापर करणारे देशातील हे पहिले क्रिकेट स्टेडियम ठरणार आहे. सध्या देशभरातील क्रिकेट, गोल्फच्या मैदानांसह इतर मोठ्या क्रीडांगणाच्या देखभालीसाठी मोठ्या प्रमाणावर लागणारे पाणी टँकरद्वारे अथवा बोअरवेलद्वारे जमिनीतून उपसा करून वापरले जाते. यामुळे कोट्यवधी लिटर पाणी वाया जात असल्याची याचिका काही महिन्यांपूर्वी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणासमोर (एनजीटी) होती. या प्रकरणी न्यायाधिकरणाने सर्व क्रिकेट स्टेडिअम, गोल्फ मैदानांच्या व्यवस्थापकांना जलसंवर्धन प्रकल्प राबविण्याचा आदेश दिला आहे. पावसाचे पाणी मुरविण्याबरोबरच, इतर कामांसाठी वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर बंधनकारक करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने पाणी फेरवापराचा निर्णय घेतला आहे. गहुंज्यातील स्टेडिअममध्ये पाण्याचा अल्पावधीत निचरा करून, त्यातील काही लाख लिटर पाणी मोठ्या टाकीत सोडण्याची व्यवस्था आहे. ही यंत्रणा अधिक व्यापक आणि अद्ययावत करून पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरविण्याचा निर्णय मंडळाचे अध्यक्ष रोहित पवार, सचिव शुभेंद्र भांडारकर यांसह नव्या पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे. 'गहुंजे स्टेडिअम बांधतानाच जमिनीखाली पाइपलाइनचे जाळे उभारले आहे. त्यामुळे मैदानावर पावसाचे पाणी अथवा पाणी फवारले, की अल्पावधीत सगळे पाणी जमिनीत मुरून पाइपद्वारे एका मोठ्या टाकीत भरले जाते. या पाण्याचा पुनर्वापर केला जातो. उन्हाळ्यातील काही महिने वगळल्यास टाकीतील पाणी आम्हाला पुरते. रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पाची उभारणी करून आम्ही जलसंवर्धनाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत आहोत,' अशी माहिती 'एमसीए'चे सचिव शुभेंद्र भांडारकर यांनी दिली.

'रेन वॉटर हार्वेस्टिंग' प्रकल्पाअंतर्गत आम्ही पावसाचे पाणी याच आवारातील बोअरवेलच्या शेजारी मोठे शोषखड्डे तयार करून ते जमिनीतच झिरपेल अशी व्यवस्था करत आहोत. या भागातील नैसर्गिक झऱ्यांना त्याचा उपयोग होऊन यामुळे भूजल पातळीत वाढ होईल, असा दावा कर्नल शशिकांत दळवी यांनी केला.

# कोल्हापूर-पुणे प्रवास करणाऱ्यांसाठी गुड न्यूज!

## एसटीने सुरू केल्या आठ ई-शिवाई बस, असे आहे वेळापत्रक



> **स्वारगेट आगारातून शुक्रवारपासून चार ई-शिवाई बस सुरू करण्यात आल्या आहेत. तर, त्यावेळी कोल्हापूर येथून देखील पुण्यासाठी चार ई-शिवाई सुरू झाल्या आहेत. याचा प्रवाशांनी लाभ घ्यावा.**
>
> **- कैलास पाटील,**
> विभागीय वाहतूक अधिकारी, एसटी पुणे विभाग

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाकडून स्वारगेट येथून कोल्हापूरसाठी चार आणि कोल्हापूर येथून पुण्यासाठी चार अशा एकूण आठ ई-शिवाई बस शुक्रवारपासून सुरू करण्यात आल्या आहेत. या बसला सकाळीपासून प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. एसटी महामंडळाकडून पाच हजार ई-बस घेण्यात येणार आहेत. त्या ई-बस राज्यात ई-शिवाई नावाने चालविल्या जाणार आहेत. या ई-बस टप्प्या-टप्प्याने वेगवेगळ्या विभागाला देण्यात येणार आहेत. एसटीच्या पुणे विभागात देखील बस तयार होतील तशा टप्प्या-टप्प्याने बस दाखल होत आहेत. राज्यातील पहिली ई-बस पुणे-अहमदनगर मार्गावर सुरू केली होती. त्यानंतर बस दाखल झाल्यानंतर त्या पुण्यातून वेगवेगळ्या शहरात सुरू केल्या जात आहेत. आता पुण्यातून मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगर या मार्गावर ई-शिवाई व ई-शिवनेरी सुरू केल्या आहेत. या बसला चांगला प्रतिसाद मिळत आहे. राज्य एसटी महामडळाच्या पुण विभागाकडे चार बस दाखल झाल्या आहेत. तर, कोल्हापूर आगाराला चार बस मिळाल्या आहेत. त्यानुसार पुणे ते कोल्हापूर आणि कोल्हापूर ते पुणे दरम्यान आठ ई-शिवाई बस शुक्रवार पासून सुरू झाल्या आहेत. या सर्व बस स्वारगेट आगारातून सुटत आहेत. दिवसभर या ई-शिवाईच्या २० फेऱ्या होणार आहेत. त्यामुळे पुणे कोल्हापूर दरम्यान प्रवास करणाऱ्यांना फायदा होणार आहे.

# कर्मचाऱ्याकडून कंपनीची फसवणूक

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** एल ॲण्ड टी कंपनीने भाडेतत्वावर घेतलेल्या साहित्याची परस्पर विल्हेवाट लावून प्रोजेक्ट डायरेक्टर ने १ कोटी ३४ लाख ७८ हजार १६४ रुपयांची फसवणूक केली आहे. तर जनरल स्ट्रक्चर मॅनेजर चढ्या दराने देयक मंजूर करून कंपनीची ४७ लाख ९ हजार ५६१ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी चंदननगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी राहुल सुबीर बॅनर्जी (वय ४६, रा. ठाणे) यांनी चंदननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार प्रोजेक्ट डायरेक्टर विजयकुमार माथनकुमार (रा. खराडी), मॅनेजर स्ट्रक्चर बसवराज चन्नागि यासह इतर २ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना जानेवारी २०१९ ते आज पर्यंतच्या काळात घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, फिर्यादी हे एल अँड टी कंपनीचे जनरल मॅनेजर सिक्युरिटी आहेत. एल अँड टी कंपनीने कन्स्ट्रक्शन कामासाठी लागणारे साहित्य हे भाडेतत्वावर घेतले होते. विजयकुमार माथनकुमार हे माहित असतांनासुध्दा पदाचा गैरवापर करून भाडेतत्वार घेतलेल्या साहित्याचे इतर सहकाऱ्यांच्या मदतीने विल्हेवाट लावून कंपनीचे १ कोटी ३४ लाख ७८ हजार १६४ रुपयांचे नुकसान केले आहे. तसेच मिशन घेऊन व्हेंडर, सब कॉन्ट्रॅक्टरचे चुकीच्या पद्धतीने बिले मंजूर करून कंपनीचे नुकसान केले आहे तर बसवराज चन्नागि हे कंपनीत मॅनेजर स्ट्रक्चरल म्हणून कामाला होते.